# नवीन शिक्षण धोरण २०२०: वस्तुनिष्ठ कि स्वप्नरंजक

**प्रा. डॉ. ओलेकर प्रमोदकुमार अंकुश,** सहा. प्राध्यापक,इतिहास विभागप्रमुख, आर्टस् अंड कॉमर्स कॉलेज, आष्टा, ता.- वाळवा, जि. सांगली. ४१६३०१ मोबाईल नंबर : ९९६०१६२६७४

---

**सारांश:** असंख्य समस्या आणि आव्हानांचा सामना करीत असलेली भारतीय शिक्षण व्यवस्था या नवीन शिक्षण धोरणातून निश्चित दिशा प्राप्त करेल असे या क्षेत्रातील आव्हाने पहाता वाटत नाही. हे नवीन शैक्षणिक धोरण समस्या निराकरणा ऐवजी अधिक समस्या निर्माण करेल असेच याचे स्वरूप पहाता वाटते. तरीही १० वी आणि १२ वी या बोर्ड परीक्षांचे महत्व कमी करण्याचा निर्णय निश्चितच चांगला आहे. जुन्या शैक्षणिक धोरणात शिक्षणाच्या विसराळूपणाचा शाप होता. विध्यार्थी अधिकधिक परीक्षार्थी बनत चालले होते. परीक्षेत यश मिळविण्यासाठी अभ्यास आणि त्यासाठी आपल्याला परीक्षेसाठी कसे पाठांतर करता येईल, लक्षात कसे ठेवता येईल यावर सर्वांचा भर असे. असे कौशल्य ज्याच्याकडे तो परीक्षेत अधिक यशस्वी होत असे. यातुन शिक्षणप्रणाली अधिकाधिक ज्ञानाभिमुख न होता परिक्षाभिमुख होत गेली. या प्रणालीवर आधारित यशस्वी पिढी प्रत्यक्ष व्यवहारात यशस्वी होताना तितकीशी दिसत नव्हती. या प्रणालीत विसराळूपणाचा शाप असल्याने परीक्षेनंतर प्राप्त ज्ञान लक्षात ठेवण्याचे किंवा त्याचा व्यवहारी उपयोग करण्याचे तारतम्य त्यात नव्हते. नवीन शिक्षण धोरणात याबाबत काही उपाययोजना दिसून येत असल्या तरी प्रत्यक्ष अमलबजावणी च्या वेळेस त्या कशा फलद्रूप होतील हे पहावे लागेल. आताची एकूण शैक्षणिक संरचना अमलबजावणी करताना अमुलाग्र परिवर्तना ला कशा पद्धतीने प्रतिसाद देते यावरच नवीन शैक्षणिक धोरणाचे यशापयश अवलंबून राहील.

नवीन शिक्षण धोरण २०२० सध्या अमलबजावणी च्या पटलावर आहे. यात शालेय शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंत आमुलाग्र बदल केले आहेत. आता शालेय शिक्षणासाठी १०+२ ऐवजी ५+३+३+४ हा नवा पॅटर्न असेल.[१] पाचवीपर्यंत मुले मातृभाषेत शिक्षण घेतील. आवडीचे विषय निवडण्याचे पर्याय असतील. कला-विज्ञान, अभ्यासक्रम आणि व्यावसायिक विषय आता वेगळे नसतील. सहावीपासून कोडिंग शिकवले जाईल. याच इयत्तेत व्यावसायिक शिक्षण सुरू होईल. ज्यात इंटर्नशीप समाविष्ट असेल. शिक्षकांशिवाय स्वत: विद्यार्थी आणि त्याचे मित्रही आता विद्यार्थ्यांचे मुल्यमापन करतील. विद्यार्थ्यांचे मूल्यमापन तीन पातळ्यांवर होईल. प्रथम - विद्यार्थी स्वत: मूल्यमापन करेल, दुसरे - सहकारी विद्यार्थी मूल्यमापन करतील. तिसरे - शिक्षक मूल्यमापन करतील.[२] १२वी उत्तीर्ण होताना संपूर्ण शालेय शिक्षणाचे मूल्यमापन एआयच्या मदतीने होईल. आर्टिफिशियल इंटेलिजन्स नवा अभ्यासक्रम असेल. एनसीटीई अध्यापनाच्या शिक्षणासाठी राष्ट्रीय प्रारूप एनसीएफटीई - २०२१ तयार करेल. २१व्या शतकातील हे पहिलेच शैक्षणिक धोरण. भारतात ३४ वर्षांनंतर हे धोरण बदलले. नवीन धोरणात मनुष्यबळ विकास मंत्रालयाचे नाव बदलून शिक्षण मंत्रालय असे केले आहे.[३]

पायाभूत साक्षरता आणि संख्या शिक्षण ही शिक्षणाची पूर्व अट आहे हे जाणून राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 मध्ये एम एच आर डी कडून पायाभूत साक्षरता आणि संख्याशिक्षण राष्ट्रीय मिशन स्थापन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सर्व प्राथमिक शाळेत सार्वत्रिक पायाभूत साक्षरता आणि संख्या शिक्षण साध्य करण्यासाठी राज्ये अंमलबजावणी आराखडा तयार करतील.देशात राष्ट्रीय ग्रंथ प्रोत्साहन धोरण आखण्यात येणार आहे. २१ व्या शतकाची प्रमुख कौशल्ये, आवश्यक शिक्षण आणि चिकित्सात्मक विचार वाढवण्यासाठी अभ्यासक्रम कमी करणे आणि अनुभवातून शिक्षणावर अधिक लक्ष केंद्रित करुन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणे हा शालेय अभ्यासक्रम आणि शिकवण्याच्या पद्धतीचा उद्देश नवीन शैक्षणिक धोरणात अंतर्भूत आहे.[४]

नवीन शिक्षण धोरणामध्ये किमान इयत्ता 5 वी पर्यंत आणि प्राधान्याने 8 वी आणि त्यानंतरही मातृभाषा / स्थानिक भाषा / प्रादेशिक भाषा हे शिकवण्याचे माध्यम असावे यावर भर देण्यात आला आहे. शालेय आणि उच्च शिक्षणाच्या सर्व स्तरांवर विद्यार्थ्यांना तीन-भाषांच्या सूत्रासह संस्कृतचाही एक पर्याय दिला जाईल. भारतातील इतर अभिजात भाषा आणि साहित्य देखील पर्याय म्हणून उपलब्ध असतील. एक भारत श्रेष्ठ भारत' उपक्रमांतर्गत इयत्ता 6--8 साठी 'भारताच्या भाषा' विषयावरील मजेदार प्रकल्प / उपक्रमात विद्यार्थी सहभागी होतील. माध्यमिक स्तरावर विविध परदेशी भाषांचा पर्याय देखील दिला जाईल. दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता वापरण्यासाठी भारतीय सांकेतिक भाषा (आयएसएल) संपूर्ण देशभरात प्रमाणित केली जाईल आणि राष्ट्रीय आणि राज्य अभ्यासक्रम सामुग्री विकसित केली जाईल.कोणत्याही विध्यार्थ्यावर कोणतीही भाषा लादली जाणार नाही.[५]

नवीन शिक्षण धोरण 2020 मध्ये सारांशात्मक मूल्यांकनाकडून नियमित आणि रचनात्मक मूल्यांकनाकडे वळण्याची कल्पना मांडली आहे जी अधिक योग्यता-आधारित आहे, शिक्षण आणि विकासाला उत्तेजन देणारी आहे आणि जी विश्लेषण, चिकित्सात्मक विचार प्रक्रिया आणि वैचारिक स्पष्टता या सारखी उच्च कौशल्ये तपासते. इयत्ता 3, 5 आणि 8 वी मध्ये सर्व विद्यार्थी शालेय परीक्षा देतील जी योग्य यंत्रणेद्वारे घेण्यात येईल. इयत्ता 10 आणि 12 वी साठी शिक्षण मंडळाच्या (बोर्ड)

परीक्षा सुरूच राहतील मात्र समग्र विकासाच्या उद्देशाने त्यांची पुनर्रचना केली जाईल. दर्जा निश्चिती संस्था म्हणून पारख (समग्र विकासासाठी कामगिरी मूल्यांकन, आढावा आणि ज्ञानाचे विश्लेषण) हे एक नवे राष्ट्रीय मूल्यांकन केंद्र स्थापन केले जाईल.[६]

जन्माच्या वेळेची परिस्थिती किंवा अन्य पार्श्वभूमीमुळे कोणताही मुलगा शिकण्याची आणि उत्कृष्टतेची संधी गमावणार नाही हे या शिक्षण धोरणाचे खास उद्दीष्ट आहे . लिंग, सामाजिक-सांस्कृतिक आणि भौगोलिक ओळख आणि अपंगत्व समाविष्ट असलेल्या सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या वंचित गटांवर (एसईडीजी) विशेष भर दिला जाईल. यामध्ये लिंग समावेश निधी आणि वंचित प्रदेश आणि गटांसाठी विशेष शैक्षणिक क्षेत्र स्थापन करण्याचा समावेश आहे. दिव्यांग मुले प्रशिक्षण , संसाधन केंद्रे, राहण्याची सुविधा , सहाय्यक उपकरणे, योग्य तंत्रज्ञान-आधारित साधने आणि त्यांच्या गरजांनुसार तयार करण्यात आलेल्या अन्य सहाय्यक साधनांच्या मदतीने पूर्व-प्राथमिक टप्प्यापासून उच्च शिक्षणापर्यंतच्या नियमित शालेय शिक्षण प्रक्रियेत पूर्णपणे भाग घेण्यास सक्षम असतील. प्रत्येक राज्य / जिल्ह्यात कला-संबंधित, करिअरशी संबंधित आणि खेळाशी संबंधित उपक्रमांमध्ये भाग घेण्यासाठी एक खास डे-टाइम बोर्डिंग स्कूल म्हणून "बाल भवन्स" स्थापन करायला प्रोत्साहन दिले जाईल. सामाजिक चेतना केंद्रे म्हणून मोफत शालेय पायाभूत सुविधा वापरता येथील.[७]

नवीन शिक्षण धोरणात प्रेरित, उत्साही आणि क्षमता निर्माण करणाऱ्या अध्यापकांच्या नियुक्तीसाठी स्पष्टपणे परिभाषित, स्वतंत्र, पारदर्शी पद्धतीने नियुक्ती करण्याची शिफारस केली आहे. अभ्यासक्रम/अध्यापनाचे स्वातंत्र्य, उत्कृष्टतेला उत्तेजन देणे, संस्थात्मक नेतृत्वाला मदत केली जाईल. मुलभूत निकषांप्रमाणे काम न करणाऱ्या अध्यापकांना जबाबदार ठरवले जाईल.

उच्च शिक्षणात जास्तीत जास्त विद्यार्थी यावेत हा उद्देश आहे. २०३५ पर्यंत उच्च शिक्षणात ५०% इतके विध्यार्थी यावेत (GER) असा दृष्टीकोन आहे. यासाठी ३.५ कोटी नव्या जागा उपलब्द केल्या जाणार आहेत. पदवीपूर्व महाविद्यालये अधिक स्वायत्त करण्यावर भर दिला जाणार आहे. महाविद्यालये विषय व अभ्यासक्रम निश्चित करतील. महाविद्यालयात आता एक वर्षानंतर प्रमाणपत्र, दोन वर्षानंतर पदविका, तीन वर्षानंतर पदवी तर चार वर्षानंतर संशोधनासाठी अहर्ता पदवी मिळेल. सामान्य कॉलेजमधूनच बीएडची पदवी चार वर्षानंतर मिळेल. सेमेस्टर पध्दत सर्वत्र लागु होईल. पदव्युत्तर शिक्षण एक वर्षाचे होईल. M.Phil ची पदवी पूर्णतः कालबाह्य होईल. महाविद्यालयांना मान्यता देण्याची पद्धत येत्या १५ वर्षांत बंद होईल. वेगवेगळ्या संस्था महाविद्यालयांचे कामकाज पाहतील. निधी, दर्जा, ॲक्रिडेशन, नियमन यासाठी वेगवेगळ्या संस्था असतील. उच्च शिक्षणासाठी नियम सौम्य, मात्र कठोर अंमलबजावणी असेल. उच्च रँकिंग असलेल्या विद्यापीठांनाच भारतात कॅम्पस उघडण्याची परवानगी दिली जाईल.[८]

वेगवेगळ्या उच्च शिक्षण संस्थांकडून मिळवलेल्या शैक्षणिक उपलब्धी डिजिटली संग्रहित करण्यासाठी अकॅडेमिक बँक ऑफ क्रेडिट ची स्थापना केली जाईल जेणेकरून माहिती हस्तांतरित करता येईल आणि अंतिम पदवी मिळवल्यावर त्याची गणना केली जाईल.बहुशाखीय शिक्षण आणि संशोधन विद्यापीठांची स्थापना (MERU)- ही आयआयटी, आयआयएमच्या तोडीची देशातील जागतिक दर्जाच्या सर्वोत्कृष्ट बहुशाखीय शिक्षणासाठी आदर्शवत म्हणून स्थापित केली जातील.नॅशनल रिसर्च फाऊंडेशनची स्थापना केली जाईल, या सर्वोच्च संस्थेच्या माध्यमातून प्रबळ संशोधन संस्कृती आणि उच्च शिक्षणामध्ये संशोधन क्षमता वृद्धींगत करण्यात येईल.[९]

भारतीय उच्च शिक्षण आयोगाची (HECI) स्थापना करण्यात येईल, वैद्यकीय आणि कायदेशीर शिक्षण वगळता उच्च शिक्षणाशी संबंधित एकमेव उच्च संस्था असेल. एचईसीआयचे 4 स्वतंत्र घटक असतील- नियमनासाठी, राष्ट्रीय उच्च शिक्षण नियामक परिषद (एनएचईआरसी), दर्जात्मक व्यवस्थेसाठी जनरल एज्युकेशन कौन्सिल (जीईसी), निधीसाठी उच्च शिक्षण अनुदान परिषद (एचईजीसी) आणि मुल्यांकनासाठी राष्ट्रीय मुल्यांकन परिषद (नॅक) असेल. एचईआयसी तंत्रज्ञानाच्या मदतीने हस्तक्षेप (फेसलेस इन्टरव्हेशन) करेल आणि एचईआयसीला नियम आणि मानदंडांचे पालन न करणाऱ्या उच्च शिक्षण संस्थांना दंड करण्याचे अधिकार असतील. सार्वजनिक आणि खासगी उच्च शिक्षण संस्था याच नियम, मुल्यांकन आणि शैक्षणिक मानदंडांद्वारे संचालित केल्या जातील.[१०]

उच्च शैक्षणिक संस्थांचे रुपांतर विशाल, उत्तम स्रोत असलेल्या, सळसळत्या बहुविषयी संस्थांमध्ये केले जाईल. यात उच्च गुणवत्तेचे शिक्षण, संशोधन आणि समुदाय प्रतिबद्धता असेल. विद्यापीठाच्या परिभाषेत बहुविध संस्था येतील ज्यात संशोधन-केंद्रीत विद्यापीठे ते शिक्षण-केंद्रीत विद्यापीठे आणि स्वायत्त पदवी-प्रदान करणारी महाविद्यालये असा विस्तार असेल. महाविद्यालयांची संलग्नता 15 वर्षांत टप्प्याटप्प्याने समाप्त केली जाणार आहे आणि महाविद्यालयांना पातळी-आधारीत यंत्रणेच्या माध्यमातून श्रेणीबद्ध स्वायत्तता देण्यात येईल. कालांतराने प्रत्येक महाविद्यालय एकतर स्वायत्त पदवी देणारे महाविद्यालय किंवा विद्यापीठाचे घटक महाविद्यालय म्हणून विकसित होईल.महाविद्यालयांची संलग्नता 15 वर्षांत टप्प्याटप्प्याने समाप्त केली जाणार आहे आणि महाविद्यालयांना पातळी-आधारीत यंत्रणेच्या माध्यमातून श्रेणीबद्ध स्वायत्तता देण्यात येईल. कालांतराने प्रत्येक महाविद्यालय एकतर स्वायत्त पदवी देणारे महाविद्यालय किंवा विद्यापीठाचे घटक महाविद्यालय म्हणून

विकसित होईल.एका राष्ट्रीय मार्गदर्शक मोहिमेची (नॅशनल मिशन फॉर मेन्टॉरिंग) स्थापना करण्यात येईल-यात उत्कृष्ट कामगिरी बजावलेल्या ज्येष्ठ/निवृत्त अध्यापकांचा समावेश असेल. भारतीय भाषांमध्ये शिकवणारे शिक्षकही यात असतील-जे थोड्या आणि दीर्घ काळासाठी मार्गदर्शक म्हणून विद्यापीठ/महाविद्यालयीन शिक्षकांना मदत करतील.[११]

सध्या संपूर्ण देशामध्ये कोविड-19 झालेला झालेला प्रसार लक्षात घेवून शिक्षण धोरण तयार करताना पर्यायी शैक्षणिक पद्धतींचा व्यापक विचार करण्या आला आहे. त्यामुळे सर्वंकष ऑनलाइन शिक्षण आणि डिजिटल शिक्षणाला चालना देण्यासाठी आलेल्या शिफारशी विचारात घेवून शैक्षणिक सज्जता सुनिश्चित केली जाणार आहे. सध्याच्या महामारीच्या काळामध्ये वैयक्तिकरितीने परंपरागत पद्धतीने शिक्षण देणे शक्य नाही, त्यामुळे दर्जेदार शिक्षणासाठी पर्याय शोधण्यात आले आहेत. मनुष्यबळ विकास मंत्रालयामध्ये ई-शिक्षणाच्या आवश्यकता पूर्ण करण्यासाठी शालेय आणि उच्च शैक्षणिक वर्गांसाठी डिजिटल पायाभूत सुविधा, शैक्षणिक सामुग्री तयार करणारे विभाग आणि डिजिटल शिक्षणासाठी समर्पित विभाग तयार केले जातील.[१२]

'नॅशनल एज्युकेशनल टेक्नॉलॉजी फोरम'एनइटीएफ) म्हणजेच 'राष्ट्रीय शैक्षणिक तंत्रज्ञान मंच' या स्वायत्त संस्थेची निर्मिती करण्यात येणार असून याव्दारे विचारांच्या देवाणघेवाणीसाठी एक व्यासपीठ- मंच उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या मंचाव्दारे शैक्षणिक मूल्यवर्धन, मूल्यांकन, तसेच नियोजन, प्रशासन यासाठी तंत्रज्ञानाचा वापर कशा पद्धतीने करता येऊ शकतो, यासाठी स्वतंत्रपणे विचारांचे आदान-प्रदान केले जाणार आहे. वर्गातील शिक्षणात सुधारणा व्हावी, शिक्षकांना व्यावसायिक प्रशिक्षण मिळावे , वंचित घटकांना शैक्षणिक सुविधा जास्तीत जास्त मिळाव्यात आणि शैक्षणिक नियोजन, प्रशासन तसेच व्यवस्थापन सुनियोजित पद्धतीने व्हावे, यासाठी सर्व स्तरावरच्या शिक्षण कार्यक्रमामध्ये तंत्रज्ञानाचे एकात्मिकरण केले जाईल.[१३]

नवीन शैक्षणिक धोरणातील वरील प्रमुख लक्षवेधी बदल पाहता भारतातील शैक्षणिक धोरणात धाडसी आणि आमुलाग्र बदल केल्याचे प्रतीत होते. मात्र हे बदल खरेच भारतातील शैक्षणिक समस्यांना पर्याय ठरतील का? नवीन शैक्षणिक धोरणात शिक्षण आणि रोजगार यात अंतर केलेले लक्षात येते. १९८६ साली शिक्षण मंत्रालयाचे मनुष्यबळ मंत्रालय असे नाव करण्यामागचा मुख्य उद्देश शिक्षित तरुणाईला राष्ट्रानिर्मितीचा स्त्रोत बनविणे हा होता. यामागे शिक्षित घटकाला रोजगार, स्वयंरोजगार उपलब्द करून देण्याचे दायित्वही काही अंशी मंत्रालयाकडे येत होते. नवीन शैक्षणिक धोरणात या जबाबदारीतून सरकार स्वतःची सोडवणूक करताना दिसत आहे. २०२० साली देशात उच्चांकी स्तरावर बेरोजगारी गेली असताना बेरोजगारीचा कसा सामना करावयाचा याचा स्पष्ट उल्लेख नवीन शैक्षणिक धोरणात आढळून येत नाही. भारतातील प्रचंड लोकसंख्या पाहता सर्वांना शिक्षण देण्याचा मानस जसा नवीन धोरणात दिसतो तसा सर्वांना आत्मनिर्भर बनविणारा रोजगार, स्वयंरोजगार उपलब्द करण्याचा कोणताही आशावाद नवीन धोरणात दिसत नाही. भारतीय पाल्य आणि पालक यांची शिक्षण घेण्यामागची मुख्य धारणा अथवा प्रेरणा हि शिक्षणामुळे आपल्याला आपले उत्तम भविष्य बनविता येईल, मुख्यत: त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात करियर बनविता येईल ही आहे.

२०१४ साली सत्तेत आलेल्या सरकारने सत्तेवर येण्यापूर्वी दरवर्षी २ कोटी इतक्या लोकांना रोजगार देण्याचे आश्वासन दिले होते. मात्र गेल्या सहा वर्षात किमान १२ कोटी लोकांचा रोजगार गेला आहे असा संसदेच्या स्थायी समितीचा ताजा अहवाल समोर आहे (कोरोना संकट काळासह). गेली सहा वर्षे तीन मनुष्यबळ विकास मंत्री देशाने पाहिले आणि तीनही मंत्री आपल्या कामाने कमालीचे विवादास्पद राहिले. आज भारतातील लोकसंख्या १३८ कोटी इतकी प्रचंड आहे. या प्रचंड लोकसंख्येचा फायदा घ्यावयाचा असेल तर या प्रचंड लोकसंख्येच्या हाताला काम कसे मिळेल याचा भविष्यवेधी दृष्टीकोन हि या नवीन शैक्षणिक धोरणातून प्रतीत व्हायला हवा होता. मात्र तो स्पष्ट रुपात तसा होताना दिसत नाही. गेल्या काही दशकात भारताने आपल्या प्रचंड लोकसंख्येला आपली कमजोरी न होऊ देता आपले बलस्थान बनवित त्या लोकसंख्येचा लाभांश (Population Dividend) मिळवीत आपला विकास साधला आहे. हे विसरून आपणाला चालणार नाही.

शिक्षण आणि प्रत्यक्ष करियर (रोजगार, स्वयंरोजगार) यातील अंतर जितके वाढत जाईल तितके समाजात गुन्हेगारीकरण वाढीस लागेल. आज उच्चशिक्षित PhD, डॉक्टर आणि इंजिनीअर झालेला तरुणही शिपाई पदाच्या सरकारी नोकरी साठी प्रयत्न करताना आपण पहात आहोत. हे दृश्य जसे जुन्या शिक्षण पद्धतीतील दोषाचे आहे तसेच समाजातील मानसिकतेचे आहे. हि समाजातील मानसिकता नष्ट करण्यासाठी विपुल प्रमाणात रोजगार आणि स्वयंरोजगार उपलब्ध करून करियर च्या विविध वाटा तरुणाईला दाखविणे हे शासनाचे कर्तव्य शासन आज पार पाडताना दिसत नाही. झिंबाब्वेचे माजी राष्ट्राध्यक्ष रॉबर्ट मुगाम्बे यांनी आजच्या या कालखंडासाठी शिक्षण विषयक एक मार्मिक टिप्पणी केली आहे. ते म्हणतात 'तुम्ही तुमच्या समोर येणाऱ्या भावी पिढ्यांना कसे पटवुन देणार आहात कि शिक्षण हि यशस्वी जीवनाची गुरुकिल्ली आहे जेव्हा गुन्हेगार हे श्रीमंत आहेत आणि पदवीधर बेरोजगार'.[१४] आज नवनवीन तंत्रज्ञान लोकांना अधिकाधिक यंत्रावर निर्भर बनवीत चालले आहे. येणारा काळ मानवी जीवनातील यंत्रयुगाचा (Automation) असणार आहे त्यामुळे पारंपारिक रोजगार आणि

स्वयंरोजगार हळूहळू धोक्यात जाणार आहेत. नवीन शैक्षणिक धोरणात आर्टिफिशल इंटेलिजंस च्या आणि ऑनलाइन शिक्षणाच्या धोरणाला प्रोत्साहन देण्याचा मानस आहे ज्यामुळे बेकारीत मोठी वाढ होऊ शकते. हे धोरण सध्या कार्यरत असणाऱ्या मनुष्यबळावरही मोठा परिणाम करेल किंबहुना त्यांना बेकारीकडे घेऊन जाईल.

उच्चशिक्षणात केले जाणारे नवीन बदल हे अधिकाधिक शैक्षणिक क्षेत्राला खाजगीकरणाच्या दिशेने घेऊन जाणारे आहेत. परदेशी विद्यापीठांना भारतात प्रवेश देण्याचे धोरण भारतातील शिक्षण व्यवस्था अधिकाधिक स्पर्धात्मक आणि गुणात्मक करण्यासाठी भासविले जात असले तरी यातुन शिक्षणाचे अधिकाधिक बाजारीकरण होण्याचाच धोखा जास्त आहे. परदेशी विद्यापीठे केवळ ज्या शिक्षणातून पैसा कमविता येईल त्यालाच प्रोत्साहन देतील. ज्या द्वारे शिक्षणाची दारे समाजातील कमजोर घटकासाठी हळूहळू बंद होत जातील. समाजातील सधन घटक आपल्या आर्थिक क्षमतेद्वारे हवे ते प्राप्त करेल तर कमजोर घटकास कायम सरकारी शाळा, महविद्यालयावर अवलंबुन रहावे लागेल. यामुळे समाजातील आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक दरी अधिकच रुंदावत जाईल.

अगोदरच असंख्य समस्या आणि आव्हानांचा सामना करीत असलेली भारतीय शिक्षण व्यवस्था या नवीन शिक्षण धोरणातून निश्चित दिशा प्राप्त करेल असे या क्षेत्रातील आव्हाने पहाता वाटत नाही. हे नवीन शैक्षणिक धोरण समस्या निराकरणा ऐवजी अधिक समस्या निर्माण करेल असेच याचे स्वरूप पहाता वाटते. तरीही १० वी आणि १२ वी या बोर्ड परीक्षांचे महत्व कमी करण्याचा निर्णय निश्चितच चांगला आहे. जुन्या शैक्षणिक धोरणात शिक्षणाच्या विसराळूपणाचा शाप होता. विध्यार्थी अधिकधिक परीक्षार्थी बनत चालले होते. परीक्षेत यश मिळविण्यासाठी अभ्यास आणि त्यासाठी आपल्याला परीक्षेसाठी कसे पाठांतर करता येईल, लक्षात कसे ठेवता येईल यावर सर्वांचा भर असे. असे कौशल्य ज्याच्याकडे तो परीक्षेत अधिक यशस्वी होत असे. यातुन शिक्षणप्रणाली अधिकाधिक ज्ञानाभिमुख न होता परिक्षाभिमुख होत गेली. या प्रणालीवर आधारित यशस्वी पिढी प्रत्यक्ष व्यवहारात यशस्वी होताना तितकीशी दिसत नव्हती. या प्रणालीत विसराळूपणाचा शाप असल्याने परीक्षेनंतर प्राप्त ज्ञान लक्षात ठेवण्याचे किंवा त्याचा व्यवहारी उपयोग करण्याचे तारतम्य त्यात नव्हते. नवीन शिक्षण धोरणात याबाबत काही उपाययोजना दिसून येत असल्या तरी प्रत्यक्ष अमलबजावणी च्या वेळेस त्या कशा फलद्रूप होतील हे पहावे लागेल. आताची एकूण शैक्षणिक संरचना अमलबजावणी करताना अमुलाग्र परिवर्तना ला कशा पद्धतीने प्रतिसाद देते यावरच नवीन शैक्षणिक धोरणाचे यशापयश अवलंबून राहील.

**संदर्भ:**

1.राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० : शिक्षण मंत्रालय भारत सरकार मराठी आवृत्ती, २०२०, पान क्र. ०३
2.राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० : शिक्षण मंत्रालय भारत सरकार मराठी आवृत्ती, २०२०, पान क्र. ०८
3.http.education.gov.in
4.राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० : शिक्षण मंत्रालय भारत सरकार मराठी आवृत्ती, २०२०, पान क्र. १०
5.राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० : शिक्षण मंत्रालय भारत सरकार मराठी आवृत्ती, २०२०, पान क्र. १२
6.राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० : शिक्षण मंत्रालय भारत सरकार मराठी आवृत्ती, २०२०, पान क्र. १४
7.राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० : शिक्षण मंत्रालय भारत सरकार मराठी आवृत्ती, २०२०, पान क्र. ३२
8.राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० : शिक्षण मंत्रालय भारत सरकार मराठी आवृत्ती, २०२०, पान क्र. ४३
9.राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० : शिक्षण मंत्रालय भारत सरकार मराठी आवृत्ती, २०२०, पान क्र. ७६
10. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० : शिक्षण मंत्रालय भारत सरकार मराठी आवृत्ती, २०२०, पान क्र. ६२
11. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० : शिक्षण मंत्रालय भारत सरकार मराठी आवृत्ती, २०२०, पान क्र. ६८
12. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० : शिक्षण मंत्रालय भारत सरकार मराठी आवृत्ती, २०२०, पान क्र. ७६
13. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० : शिक्षण मंत्रालय भारत सरकार मराठी आवृत्ती, २०२०, पान क्र. ७९
14. Http://www.nairaland.com